# MULTIDISCIPLINARY RESEARCH

Prof. Rajani Shikhare

MULTIDISCIPLINARY RESEARCH - Prof. Rajani Shikhare


| | | |
|---|---|---|
| **Publisher** | : | Anand Prakashan,<br>Jaisingpura, Aurangabad.(M.S)<br>Cell : 9970148704<br>Email: anandprakashan7@gmail.com |
| © | : | Author |
| **Typeset At** | : | Anand Computer<br>Aurangabad. |
| **Edition** | : | December 2020 |
| **ISBN No** | : | 978-93-90004-07-2 |
| **Cover Design** | : | Aura Design<br>Mumbai. |
| **Printed At** | : | Om Offset<br>Aurangabad. |
| **Main Distributor** | : | Anand Book Depot<br>Jaisingpura, Aurangabad - 431004 |
| **Price** | : | ₹ 120 /- |

# MULTIDISCIPLINARY RESEARCH

## INDEX


| Sr.No | Title | Page. No |
|---|---|---|
| 01. | विनय मिश्र की ग़ज़लों में राजनीतिक चेतना - **प्रो.रजनी शिखरे** | 07-09 |
| 02. | संत साहित्य में विवस्था का विरोध - **राजाराम बाबासाहेब जाधव** | 10-12 |
| 03. | स्वातंत्र्योत्तर भारत की विसंगतियो का महत्वपूर्ण दस्तावेज : 'पूरब खिले पलाश'-**संतोष नागरे** | 13-17 |
| 04. | होय ! लेखक घडवता येऊ शकतो - **डॉ. समाधान इंगळे** | 18-21 |
| 05. | अण्णाभाऊ यांची लोकनाट्ये - **डॉ.संदीप अ.बनसोडे** | 22-26 |
| 06. | "आधुनिक कुटूंब व्यवस्थेतील नाते संबंधातील द्वंद्वावर भाष्य करणारे नाटक - नथिंग टु से" - **डॉ. संदिप बनसोडे** | 27-29 |
| 07. | Realism In R.K.Narayan's Novel The GUIDE' - Dr.V.S.Bandal | 30-38 |
| 08. | Absurd Elements in Harold Pinter's The Birthday Party, The Caretaker and The Homecoming. - Jadhav Arun Malhari | 39-41 |
| 09. | Global and International Evidence-Based Library Activities and Demand of Health Librarians - R.B. Pagore | 42-52 |
| 10. | Study of Second ARCs view on Police Reforms. - Hanmant B.Helambe | 53-57 |
| 11. | Capital Formation In Agricultural Sector - Mr B. S Jogdand | 58-61 |
| 12. | 'Farmer suicide a social problem' - Mr. R. B. Kale | 62-66 |
| 13. | The Role of Opposition Party In Indian Democracy. - Dr. S.N. Satale | 67-71 |
| 14. | Impact of E-Commerce in Rural India - Dr. Waykar Vivek | 72-77 |
| 15. | A Study of Commercial Agriculture: Issues and Challenges before ancestor agriculture in India. - Sandip B. Vanjari | 78-82 |
| 16. | Synthesis, Characterization and Antimicrobial Analysis of Some New Pyrimidines Containing Pyrazole Moiety. - Amol J. Shirsat*, Balaji D. Rupnar, Sunil S. Bhagat | 83-88 |

6

# ''आधुनिक कुटूंब व्यवस्थेतील नाते संबंधातील द्वंद्वावर भाष्य करणारे नाटक - नथिंग टु से''

- मार्गदर्शक -

**डॉ. संदिप बनसोडे**

मराठी विभाग प्रमुख

रा.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई

संशोधक विद्यार्थी : **सुनिल सदाशिवराव कांबळे**

**नाट्यशास्त्र विभाग**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद.

मो.नं. ९९७५१३६६७५

मानवी समाजव्यवस्थेतील प्रमुख घटक म्हणजे कुटूंब होय. दोन किंवा अधिक स्त्री-पुरूषांच्या समुहास कुटूंब संबोधले जाते. परंतु समाजव्यवस्थेत वेळोवेळी बदल हा काळानुरूप होत गेल्याचे आजवरच्या अध्यायनातुन दिसून येते. अगदी सुरूवातीच्या समाजव्यवस्थेमध्ये कुटूंब ही संकल्पना अस्तित्त्वात नव्हती. त्याकाळात मानवाचे लहान मोठे गट होते. अशी मते काही विकासवादी विचारवंतानी मांडलेली आहेत. पण त्यामध्ये काही तथ्ये नसल्याचे दिसून आले. कारण कुटूंबातील आई, वडील आणि मुले यांचे अस्तित्त्व हे प्रत्येक काळात असल्याचे दिसून आले आहे.

कुटूंब या संकल्पनेचे अभ्यास करत असतांना असे निदर्शनास येते की, कुटूंब हा समाजातील आधारभूत प्राथमिक गट आहे. प्रेम, आपुलकी, त्याग नाते संबंधातील हीत संबंध तसेच एकमेंकाशी सहकार्याची भावना ही कुटूंबात निर्माण होते. समाजातील व्यक्ती हा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या कुटूंब संस्थेवरच अवलंबून असते. समाजातील सामाजिक मुल्ये, परंपरा, रितीरिवाज, यांचा वारसा व्यक्तिला कुटूंबाकडून वेळोवेळी मिळत असल्याचे दिसून येते. समाज जीवन आणि सामाजिक रचनेला चालना देण्याचे कार्य कुटूंब व्यवस्थेमार्फत होत असते. समाजातील वेगवेगळ्या स्तरामध्ये धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक बदल हे कुटूंबामार्फतच होत असतात. आपल्या भारतीय कुटूंब पद्धतीला लक्षात घेतले असता आपली कुटूंब पद्धती ही मातृसत्ताक व पितृसत्ताक तसेच संयुक्त कुटूंब पद्धती ही आढळून येते. भारतीय कुटूंबे ही विवाह संस्काराद्वारे बनली गेली आहेत. यामध्येही एकल विवाह, बहु पत्नी विवाह आणि बहुपती विवाह अशा वेगवेगळ्या स्वरूपात कुटूंबांची निर्मिती झालेली दिसून येते. यात एकल विवाह पद्धतीनुसार पती किंवा पत्नीस एका सोबत आयुष्य जगावे लागते, तर बहु पत्नी विवाह पद्धतीनुसार एका पुरूषाला एकाच वेळी एका पेक्षा जास्त बायका असल्याचे आढळून येते आणि ते सगळे एकत्र वास्तव्य करतात. अशी कुटूंबे

प्रामुख्याने भारतात दक्षिण भागातील 'तोडा' आणि उत्तर भागातीला 'खासा' या आदीवासी जमातीमध्ये दिसून आली आहे. हळुहळु आधुनिकतेमुळे कुटूंबपद्धती मध्ये बदल घडत गेली ज्यातून एकत्र कुटूंब पद्धती आणि विभक्त कुटूंब पद्धती निर्माण झाल्या. एकत्र कुटूंब पद्धतीमध्ये रक्तसंबंधामध्ये असलेल्या सर्व नातेवाईक समुहाने एकाच छताखाली एकत्र वास्तव्य करत असल्याची दिसते. तर विभक्त कुटूंब पद्धतीमध्ये विवाह संस्कारामार्फत पती-पत्नी व त्यांचे अपत्य एकत्र राहत असतात. आजच्या आधुनिक कुटूंब व्यवस्थित आता सर्वत्र विभक्त कुटूंब पद्धती ही रूढ झालेली दिसून येते. आजच्या कुटूंब पद्धतीमध्ये औद्योगिकरण आणि शहरीकरणाचा प्रभाव सर्वदूर पडला आहे. या आजच्या आधुनिक विभक्त कुटूंब पद्धतीत जीवनात माणसाला सर्व चैनीच्या सुखसोई उपलब्ध होतांना दिसून येतात. तसेच मनुष्याला आपल्या भौतिक गरजा भागविण्यासाठी अडचण येत नाही असे निदर्शनास. या उलट एकत्र कुटूंब पद्धतीत माणसाला सर्वांच्या गरजा व ईच्छा पूर्ण करता येत नाही. जेणकरून विभक्त कुटूंब पद्धतीची निर्मिती झाली आहे. पण यामुळे माणसाला या विभक्त कुटूंब पद्धतीमध्ये अनेक प्रश्नांना आणि समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आजच्या आधुनिक समाजातील कुटूंबव्यवस्था ही बिघडत चाललेली आहे. समाज ज्याच्यामुळे एकत्र रहायचा त्या कुटूंब व्यवस्था योग्य रितीने कार्यन्वीत नसल्याची दिसून आली आहे, म्हणूनच अनेक कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक प्रश्न आणि समस्या समाजाला भेडसावत आहेत.

आज कुटूंब व्यवस्था बदलत आहे. व्यक्ती-व्यक्तींमध्ये आचार विचाराच्या आणि सवयीच्या बदलामुळे भारतीय एकत्र कुटूंब पद्धतीला फाटे फुटून विभक्त कुटूंब पद्धती ही आजच्या आधुनिक समाजात रूढ होत चाललेली आहे. आजच्या या विभक्त कुटूंब पद्धतीत जगतांना मनुष्याचे एकमेकांशी असलेली नाते संबंध ईर्ष्येमुळे दुरावत चालली आहे. जुन्याकाळी एकत्र कुटूंबातील कर्ता पुरूष हा कुटूंब प्रमुख मानला जायचा त्याच्या निर्णयानुसार कुटूंब चालायचे. एकत्र कुटूंबातील सदस्यावर त्यामुळे चांगले संस्कार व्हायचे, तसेच चांगल्या सामाजिक मूल्यांची माहिती ही कुटूंबातील सर्व सदस्यांना मिळत असे, तसेच सहकार्य भावना ही एकत्र कुटूंबामध्ये दिसून येते जेणेकरून कुटूंबावर आलेल्या समस्यांचे निराकरण कुटूंबातील सर्व सदस्य मिळून करायचे. परंतु सामाजिक परिस्थिती जसजशी बदलत गेली. त्यामुळे विभक्त कुटूंब पद्धतीमध्ये रक्तसंबंधातील व्यक्ती-व्यक्तीमध्ये फुट पडलेली निदर्शनास येते. सद्यस्थितीला प्रत्येकाचे विचार वेगळे, संस्कार वेगळे आणि वर्तणूकीमध्ये वेगळ्या आणि एकत्र कुटूंब पद्धतीमधील शिस्त म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा अशी भावना पसरत गेल्यामुळे आधुनिक समाजात विभक्त कुटूंब पद्धती मुळ धरू लागली आणि आपल्याला स्वतंत्र मिळाला हवे असे प्रत्येकाला वाटत असल्यामुळे भिक्त कुटूंब पद्धतीला सर्वत्र मान्यता मिळू लागली. परंतु व्यक्ती स्वतंत्र्याच्या नावाखाली आज समाजात स्वैर विचार आणि खोटेपणा हा विभक्त कुटूंब पद्धतीमुळे फोफावला.

आज नात्यांनात्यामध्ये असलेल्या ऋणानुबंध तुटत असल्याचे प्रकर्षाने दिसून येते आहेत. आई-वडिल आणि मुले यांचे संबंध हे आपुलकीचे न राहता व्यवहारी झाल्याचे निदर्शनास आले आहे. आणि याचाच दुष्परिणाम कुटूंबाच्या आर्थिक, सामाजिक, भावनिक जडणघडणीवर होत असल्याचे दिसून येते. 'नथिंग टू से' या प्रसाद दाणी लिखित नाटकामध्ये आधुनिक समाजातील विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये आयुष्य काढणाऱ्या व्यक्ती-व्यक्तीच्या नाते-संबंधामधल्या संघर्षावर भाष्य केले गेले आहे. आधुनिक जगातील विभक्त कुटूंब व्यवस्था ही सामाजिकदृष्ट्या कशी फोल 'रली आहे आणि कुटूंब आणि त्यातील सदस्यांची एकमेंकामधील संबंध कसे हालाखीच्या स्थितीमध्ये येऊन पोहचली आहे आणि नातेसंबंध, भावभावना, एकमेकांविषयीची प्रेम भावना नष्ट होऊन व्यवहारी होत असल्याची मांडणी 'नथिंग टू से' या नाटकात केली गेलेली आहे.

सदरील नाटकाची पार्श्वभूमी अशी की, माधव सहस्त्रबुद्धे हा एका मोठ्या कपंनीचा अधिकारी आपल्या आलीशान फ्लॅटमध्ये वास्तव्याला असतो. सर्व सुखसोईयुक्त जीवन तो जगत असल्याचे सुरूवातीच्या नाट्य प्रसंगावरून आपणाला दिसून येते. ती आणि त्याचा नोकर जिग्नेश हे दोघेच एकमेकांच्या संपर्कात येऊन, एकमेकांना मदत करत आयुष्य जगत असतात. नंतर पुढे माधव सहस्त्रबुद्धे यांचे कुटूंब हे त्यांच्या पासून विभक्त राहत असल्याचे दामले आणि सहस्त्रबुद्धे यांच्यातील एका प्रसंगावरून प्रेक्षकांना समजते. माधव फ्लॅटमध्ये एकाकी जीवन जगत असत, त्यांना त्यांच्या कुटूंबाबद्दल प्रेम असते. पण कौटूंबिक कलहामुळे त्यांच्यापासून विभक्त राहत असते. एकेदिवशी माधव यांच्या घरी एक पंचविशीतली तरूणी पाहुणी म्हणून येते ती अनोळखी असल्याने माधव तिची विचारपुस करतो. पुढे त्यांच्यातील चर्चेतून असे समजते की, ती मुलगी माधवचीच असते. तीचे नाव मालविका ती त्याला भेटायला आलेली असते. ती त्याला जाब विचारते की, बाप असतांना देखील ती अनाथासारख आयुष्य जगली याच कारण काय? माधवला त्रास देण्याच्या हेतूने ती माधवकडे आलेली असते. प्रथमदर्शी प्रेक्षकांना पहिल्या अंक पाहिल्यावर ही परिस्थिती समजते. परंतु माधवच्या आयुष्यामधला असलेल्या जिग्याद्वारे मालविकाला समजते की, माधव पण आपल्या पासून विभक्त होऊ दु:खी आणि एकाकी झालेला आहे आणि तो आपल्या कुटूंबावर खूप प्रेम करत असतांनाही त्यांच्यापासून दूर राहतो. माधव आणि त्याच्या पत्नीसोबतच्या भांडणामुळे आपला परिवार विभक्त झाल्याचे नाटकात मालविकाला कळते. यावरून मालविका आणि माधव या बापलेकीच्या नात्यातील दुराव्यावर आधारित हे नाटक आहे. सदरील नाटकाद्वारे लेखकाला सध्याच्या आधुनिक काळातील विभक्त कुटूंबातील समस्या आणि नातेसंबंधातील दुरावा याचे चित्रण प्रेक्षकापुढे केली आहे. तसेच विभक्त कुटूंब पद्धतीमध्ये बाप लेकीच्या नातेसंबंधाच्या द्वंद्व हे संपूर्ण नाटकामध्ये दिसून येते. या नात्याला पुन्हा जोडून आणण्यासाठी व्यक्ती-व्यक्तीमध्ये सुसंवाद असणे आवश्यक आहे. ही बाब लेखकाने नाटकाच्या शेवटी मांडलेली आहे.

आजची भौतिक सुख आणि खोट्या प्रमाणासोबत आयुष्य जगतांना कुटूंबातील व्यक्तीचे नाते विरळ होत आहे. हे नातेसंबंध सुधारायचे असले तर व्यक्ती-व्यक्तीमध्ये त्याबाबतीत सुसंवाद होऊन विचार व्हायला हवा. तसेच एकमेंकाना समजुन घ्यावे हवे. हे नाटकाद्वारे लेखक दर्शवित आहे.

सदरील शोधनिबंधाद्वारे एक संशोधक विद्यार्थी म्हणून मला असे नमुद करायचे की, प्रसाद दाणी लिखित 'नथिंग टु से' या समाजव्यवस्थेतील विभक्त कुटूंबामध्ये आयुष्य जगत असलेल्या व्यक्तींचे नाते संबंध हे दृढ स्वरूपाचे राहिले नसून त्यांच्यात सुसंवाद नसल्याचे कौटूंबिक प्रश्‍न आणि समस्या सद्यस्थितीला त्याचा व्यवस्थेवर होत आहे. म्हणून यावर चिंतन व्हावे यासाठी या नाटकावर भाष्य केले आहे.

**संदर्भ :**


१. डॉ. ज्युबेदा तांबोळी, ब्लॉग, 'कुटूंब जीवन काल, आज आणि उद्या'

a. https//jyubedatamboli.blogspot.com/2020/07

२. डॉ. इरावती कर्वे, 'मराठी लोकांची संस्कृती लोक-संस्कृती म्हणजे काय?'
प्रकाशन -रा.ज. देशमुख, प्र.आ.- १९५१.

३. जयंत गडकरी, 'समाज आणि धर्म' प्रकाशन-समाजवादी महिला चळवळ, प्र.आ. १९८९.

४. अनुसया लिमये, 'स्त्रीचे समाजातील स्थान व भूमिका' प्रकाशन-चिटणीस समाजवादी महिला पुणे.

५. डॉ. बी.आर. जोशी, 'सामाजिक संकल्पना सिद्धांत कोश राज्यशास्त्र', डायमंड Pune, २००७.

६. प्रसाद दाणी, 'नथिंग टू से', मुंबई, २०१८.